# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर अहवाल

वर्ष २०२४-२५

शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, द्वारा संलग्नित शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे सात दिवसीय निवासीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन **टाकळी** (**जहागीर**) ता. अमरावती येथे दि. २४/०२/२०२५ ते ०२/०३/२०२५ ह्या दरम्यान करण्यात आले. या शिबिरात श्रमदानातून स्वच्छता अभियान, आरोग्य विषयक जनजागृती, डिजिटल साक्षरता, बंधारा शोषखड्डे आणि वृक्षसंवर्धन यासारखे प्रकल्प राबविण्यात आले. बौद्धिक सत्रातून स्पर्धा परीक्षा, युवा पिढी व सामाजिक दृष्टिकोण , मी भारत आहे , व्यक्तिमत्व विकास व सामाजिक जबाबदारी, एड्स निर्मूलन कार्यक्रम आणि महिला सक्षमीकरण अशा विषयांवर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. उपरोक्त विशेष शिबीर विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या परवानगीने आयोजित करण्यात आले. या शिबिराचा मुख्य हेतू स्वच्छता अभियान, आरोग्य विषयक जनजागृती, उन्नत भारत अभियानाअंतर्गत सर्वेक्षण आणि वृक्षसंवर्धन हा होता. या प्रमुख उद्देशाने महाविद्यालयाचे २५ विद्यार्थी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा मोना यो अग्रवाल व डॉ पी आर पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.

**१. दि. २३/०२/२०२५ (आगमन व नियोजन)**

शिबिराच्या पहिल्या दिवशी दि. **२३/०२/२०२५** रोजी दुपारी २.०० वाजता सर्व शिबिरार्थींचे आगमन झाले त्यानंतर सर्व शिबिरार्थींची नोंदणी करण्यात आली. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा मोना यो अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर शिबिरार्थींचे सात गटात विभाजन केले व ड्रग डिस्कवरर, लॅब लेजेंड्स,फार्मा पिओनीर्स,आरएक्स रेबेल्स,कॅप्सुल क्र्यु अशी नावे देण्यात आली व त्यांना त्यांची जबाबदारी समजावून देण्यात आली.तसेच सात दिवसीय विशेष शिबिरासंबंधी संक्षिप्त माहिती देऊन शिबिराची पूर्वतयारी करण्यात आली. त्यानंतर निवासी परिसराची स्वच्छता करण्यात आली.. सांयकाळच्या सत्रात सामूहिक प्रार्थना घेण्यात आली व त्याच बरोबर दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगण्यात आली. अशाप्रकारे शिबिराचा पहिला दिवस उत्तमरीत्या पार पडला.

**२. दि. २४/०२/२०२५** (**ड्रग डिस्कवरर**)

प्रभातकालीन दिनचर्येचा सात वाजेपासून प्रारंभ झाला. दि. २४/०२/२०२५ रोजी ड्रग डिस्कवरर ग्रुपने कार्यक्रमाची धुरा सांभाळली. सकाळी ७.०० वाजता सर्व शिबिरार्थी प्रार्थनेसाठी एकत्र आले; प्रार्थना संपल्यानंतर लगेचच योगासने व प्राणायाम घेण्यात आले. त्यानंतर सर्व शिबिरार्थींना चहा व नाश्ता देण्यात आला व नियोजित श्रमदानाविषयी माहिती देण्यात आली. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी गाव स्वच्छता आणि वृक्षारोपणासाठी खड्डे तयार केले. शोष खड्डे साठी तयारी करण्यात आली. सदर ठिकाणी शिबिरार्थींनी मंदिर स्वचछ करून वृक्ष लागवड साठी खड्डे तैयार केले, श्रमदानानंतर शिबिरार्थींना वैयक्तिक स्वच्छता व भोजनासाठी अवकाश देण्यात आला. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा. “करियर गाईडन्स” या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ अमोल खरात सर यांनी शिबिरार्थी व उपस्थित युवकांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा डॉ योगेश अग्रवाल यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली व स्वयंसेवकांचे मनोबल वाढविले. सांयकाळच्या सत्रात प्रार्थना व स्फुर्तीगीते घेण्यात आली. रात्री आयुष पोटे व संच यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**३. दि. २५/०२/२०२५** (**लॅब लेजेंड्स**)

दि. **२५/०२/२०२५** रोजी लॅब लेजेंड्स ग्रुपने कार्यक्रमाची धुरा सांभाळली. त्यांनी वेळापत्रकाप्रमाणे प्रार्थना, योगासने व प्राणायाम घेतले. त्यानंतर सर्व शिबिरार्थींना चहा व नाश्ता देण्यात आला व लगेचच सर्व शिबिरार्थी नियोजित श्रमदानाकरीता पोहोचले. दुसऱ्या दिवशी ग्राम स्वछता वर भर दिला. शोष खड्डा तैयार करण्यात आला व वृक्ष लागवड साठी खड्डे तैयार केले. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा. शिबिराचा उदघाटन समारंभ आयोजित करण्यात आला. शिबिराचे उदघाटन प्रमुख अतिथी मा श्री राजकुमार सरवटकर, उपसरपंच, रेखा ठाकुर , सचिव, मंगेशभाऊ फाटे व इतर ग्रा. प. सदस्य आणि ग्रामस्थ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून दीपप्रज्वलन करून करण्यात आले याप्रसंगी सर्व प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना संबोधित केले. सायंकाळी ग्राम दिंडीची तयारी करण्यात आली व ठीक ६.३० वाजता दिंडीची सुरुवात शिबिरस्थळापासून करण्यात आली. दिंडीत गावातील लहान मुलांचा सहभाग वाखाणण्याजोगा होता. दिंडीतुन विविध सामाजिक समस्यांवर प्रबोधन करून जनजागृती करण्यात आली. त्यासाठी शिबिरार्थींनी विविध फलके, घोषणा, इ. ठिकठिकाणी सादर करण्यात आली व सामाजिक प्रबोधन करण्यात आले. सांयकाळच्या सत्रात प्रार्थनेनंतर माधुर्य व संच यांनी नाट्य सादर केले तसेच गावातील

**४. दि. २६/०२/२०२५ (**फार्मा पिओनीर्स**)**

दि. **२६/०२/२०२५** रोजी फार्मा पिओनीर्स ग्रुपने कार्यक्रमाची धुरा सांभाळली. त्यांनी नियोजित वेळेप्रमाणे प्रार्थना, योगासने व प्राणायाम पार पाडले. त्यानंतर सर्व शिबिरार्थींना चहा व नाश्ता देण्यात आला. उपहारानंतर शिबिरार्थी नियोजित प्रकल्पावर सर्व साहित्यानिशी श्रमदानाकरीता पोहोचले. व सदर प्रकल्पावर जलयुक्त शिवार अंतर्गत नाला खोलीकरण व रुंदीकरण करून सिमेंटच्या रिकाम्या गोणीत माती भरून बंधारा बांधण्याची तैयारी करण्यात आली. शोष खड्डा पूर्ण करण्यात आला. वृक्षारोपण करण्यात आले. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा. मा. श्री. अतुल रामतटेके, उपविभागीय अभियंता बांधकाम विभाग जि प अमरावती, यांनी स्वयंसेवकांना युवा पिढी व सामाजिक दृष्टिकोण या विषयावर मार्गदर्शन केले. सांयकाळच्या सत्रात पवन महाराज दवंडेंनी आपल्या वाणीतून समाजतील विविध विषयांवर सप्त्खंजेरी सूरात प्रबोधन केले.

**५. दि. २७/०२/२०२५ (**आरएक्स रेबेल्स**)**

आजच्या दिवसाच्या कार्यक्रमांचे व्यवस्थापन करण्याकरिता आरएक्स रेबेल्स ग्रुपने सर्व सूत्र ताब्यात घेतली. त्यांनी नियोजित वेळेप्रमाणे प्रार्थना, योगासने व प्राणायाम पार पाडले. त्यानंतर सर्व शिबिरार्थींना चहा व नाश्ता देण्यात आला. डिजिटल साक्षरता कार्यक्रमांतर्गत, जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना इंटरनेट, ऑनलाइन पेमेंट कसे करावे, वैयक्तिक स्वच्छता आणि गणिताच्या काही मनोरंजक युक्त्या यासंबंधी विविध शिक्षण ॲप्स समजून देण्यात आले. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा. डॉ. प्रमोद मिसाळ, समुपदेशक, ICTC, पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांनी 'एचआयव्ही एड्स: युवकांचे दशा व दिशा' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच एड्सबरोबरच सिकल सेल अनेमिया, क्षयरोग, आणि रक्तदान याबाबत मार्गदर्शन केले. सांयकाळी वेळापत्रकाप्रमाणे प्रार्थना घेण्यात आली. रात्री चैतन्यव संच यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. रात्री शिबिरास महाविद्यालयातील प्र प्रा. डॉ. नजमा ईनामदार , डॉ. एन आर कोटगले आणि प्रा दीपाली घोरपडे यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली व स्वयंसेवकांचे मनोबल वाढविले. तसेच विद्यार्थ्यांत सकारात्मक ऊर्जा निर्माण करून त्यांना समाजपयोगी कार्यासाठी प्रेरित केले व सर्व मान्यवरांनी शिबिराच्या एकूण नियोजनाचे कौतुक केले.

**६. दि. २८/०२/२०२५ (कॅप्सुल क्र्यु)**

आज दिवसभराच्या कार्यक्रमांच्या नियोजनाची जबाबदारी कॅप्सुल क्र्यु आपल्या हातात घेतली. त्यांनी नियोजित वेळेप्रमाणे प्रार्थना, योगासने व प्राणायाम पार पाडले. त्यानंतर सर्व शिबिरार्थींना चहा व नाश्ता देण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, त्यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवकांनी ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. या कार्यक्रमात 150 ते 160 गावकऱ्यांनी त्यांची रक्तदाब, रक्तातील साखर आणि रक्तगट तपासणी केली. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा. व्यक्तिमत्व विकास व सामाजिक जबाबदारी या विषयावर श्री. मिलिंद तायडे जनसंपर्क अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती , यांनी विविध प्रयोगाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच अनौपचारिक सत्रात उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. त्यानंतर सायंकाळी शिबिरास महाविद्यालयातील प्रा डॉ एम शेंडे , प्रा दीपक पवार व डॉ. एन आर कोटगले यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली व स्वयंसेवकांचे मनोबल वाढविले सांयकाळच्या सत्रात प्रार्थनेनंतर गावातील शालेय विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

**७. दि. ०१/०३/२०२५ (ड्रग डिस्कवरर)**

दि. **०१/०३/२०२५** रोजी ड्रग डिस्कवरर ग्रुपने शिबिराची दिवसभराची सूत्रे सांभाळली. दिवसाची सुरुवात प्रार्थना व योगासने घेऊन करण्यात आली**.** सकाळच्या दैनंदिन कार्यक्रमानंतर शिबिरार्थींनी ग्राम स्वच्छ्ता, शोष खड्डा, बंधारा काम पूर्ण केले. बौद्धिक सत्रात दु. ३.०० वा मा श्री नाना रामतकर यांनी ‘मी भारत आहे”या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. सांयकाळी गावात स्वयसेवकांकळून “औषधाचे महत्व” या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. रात्री वेळापत्रकाप्रमाणे प्रार्थना व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. रात्री स्वराज व संच यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**८. दि. ०२/०३/२०२५** (कॅप्सुल क्र्यु)

या दिवसाची संपूर्ण जबाबदारी कॅप्सुल क्र्यु ग्रुपने संभाळण्याकरिता सूत्र हातात घेतली. सकाळी लवकर उठून नियोजित दुपारच्या सत्रात समारोप समारंभ घेण्यात आला. समारोप समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सौ अर्चना तायडे , सरपंच , इतर प. स. सदस्य, पुजा लिंगोटे अध्यक्ष गुरुदेव सेवा मंडल व अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नजमा ईनामदार व आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या स्मृतीस अभिवादन करून करण्यात आली. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा मोना अग्रवाल यांनी केले. याप्रसंगी शिबिरार्थींनी शिबिराद्वारे आपल्या व्यक्तिमत्वावर घडलेल्या बदलांबाबत मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मा. श्री पुजा लिंगोटे यांनी शिबीर यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले व उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मा. डॉ. नजमा ईनामदार मॅडम यांनी शिबीराकरिता सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थांचे आभार मानले व उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ पी आर पाटील सर यानी केले. अशा रीतीने शिबिराचा समारोप करून ग्रामस्थांचा निरोप घेतला.

मोना यो अग्रवाल

रासेयो कार्यक्रम अधिकारी